IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# स्वातंत्र्योत्तर सुधारणा व भारताची राष्ट्र उभारणी

**सोहम प्रणिता सतीश पावशे**

सहाय्यक प्राध्यापक

रयत शिक्षण संस्थेचे रावबहादुर नारायणराव बोरावके महाविद्यालय (स्वायत्त) ता. श्रीरामपूर , जि. अहिल्यानगर.

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*21 व्या शतक*
*भारत*

**ABSTRACT**

आज 21 व्या शतकात वावरत असताना आपणास एक गोष्ट मान्य करावी लागेल, व ती म्हणजे जागतिक पातळीवरती भारताने आपला स्वतःचा असा एक ठसा उमटवलेला आहे. परंतु जागतिक पातळीवर विचार करायला गेल्यास, भारत व इतर देशांना एक समान तराजूत तोलून उपयोग नाही, कारण भारतासमोरील आव्हाने व त्याची जडणघडण ही एका खूप वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. खरे म्हणजे एक राष्ट्र म्हणून जडणघडण होत असताना कोणत्याही प्रकारे सर्व राष्ट्रांना एका बिंदूपासून पाहणे योग्य ठरणार नाही. याच न्यायाला धरून भारताला सुद्धा त्याच्या राष्ट्र उभारणीत विविध अडचणींना सामोरे जावे लागले, तसेच त्याला विविध घटकांचा फायदा देखील झाला. म्हणूनच जगात राष्ट्र म्हणून उभ्या टाकलेल्या अनेक देशांचा प्रवास आपापल्या परीने संघर्षाचा व गौरवाचा राहिलेला आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 6%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Pavashe, S. P. S. (2025). *स्वातंत्र्योत्तर सुधारणा व भारताची राष्ट्र उभारणी.* IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **656–662.**

**प्रस्तावना :**

आज 21 व्या शतकात वावरत असताना आपणास एक गोष्ट मान्य करावी लागेल, व ती म्हणजे जागतिक पातळीवरती भारताने आपला स्वतःचा असा एक ठसा उमटवलेला आहे. परंतु जागतिक पातळीवर विचार करायला गेल्यास, भारत व इतर देशांना एक समान तराजूत तोलून उपयोग नाही, कारण भारतासमोरील आव्हाने व त्याची जडणघडण ही एका खूप वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. खरे म्हणजे एक राष्ट्र म्हणून जडणघडण होत असताना कोणत्याही प्रकारे सर्व राष्ट्रांना एका बिंदूपासून पाहणे योग्य ठरणार नाही. याच न्यायाला धरून भारताला सुद्धा त्याच्या राष्ट्र उभारणीत विविध अडचणींना सामोरे जावे लागले, तसेच त्याला विविध घटकांचा फायदा देखील झाला. म्हणूनच जगात राष्ट्र म्हणून उभ्या टाकलेल्या अनेक देशांचा प्रवास आपापल्या परीने संघर्षाचा व गौरवाचा राहिलेला आहे.

सदर शोधनिबंधात भारताच्या स्वातंत्र्योत्तर सुधारणा व राष्ट्र उभारणी या घटकाचा आढावा घेतलेला आहे. कोणत्याही राष्ट्राची उभारणी अथवा जडणघडण ही एका रेषेत वा विशिष्ट कप्प्यात होत नसते. ती कालावधीला अनुसरून नसते. याप्रमाणे भारतात सुद्धा अनेक सुधारणा या विविध कालावधीत झाल्या त्या सर्वांचा आढावा घेऊन, त्या राजकीय आर्थिक सामाजिक व इतर या उपघटकात विभागून त्या पद्धतीने आढावा घेण्यात आला आहे. वर उल्लेख केलेल्या सर्व उपघटकांचा भारताच्या राष्ट्र उभारणीत कशा पद्धतीने हातभार आहे त्यासंबंधीचे विश्लेषण आहे. प्रत्येक उपघटकात त्याच्याशी संबंधित महत्त्वाच्या घटना व निर्णयांचे विश्लेषण आहे व त्याचा राष्ट्र उभारणीशी असलेला संबंध विश्लेषित केलेला आहे. याच प्रमाणे संशोधन पद्धतीशास्त्राच्या इतर घटकांचा सुद्धा अंतर्भाव सदर् निबंधात आहे. निबंधाच्या शेवटी संबंधित प्रकरणाच्या गोषवारा देऊन अभ्यासकाचे मत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- स्वातंत्र्योत्तर भारतातील सुधारणांचा अभ्यास करणे.
- संबंधित सुधारणांचा राष्ट्र उभारणीच्या कार्यात कशाप्रकारे हातभार लागला ते तपासणे.
- स्वातंत्र्योत्तर भारतातील सुधारणा व राष्ट्र उभारणीच्या संबंधांचा अभ्यास करणे.
- सुधारणांअंतर्गत वर्गवारी करून कोणत्या प्रकारच्या सुधारणा अधिक प्रभावी ठरल्या याचा अभ्यास करणे.

**विषयाचे संशोधकीय महत्त्व :**

- स्वातंत्र्योत्तर भारतातील सुधारणांचा अभ्यास करण्यास महत्त्वाचा ठरेल.
- स्वातंत्र्योत्तर भारतात झालेल्या सुधारणांचे राष्ट्र उभारणीच्या कार्यातील महत्त्व समजून येण्यास उपयोगी ठरेल.
- स्वातंत्र्योत्तर भारतातील सुधारणा व राष्ट्र उभारणीचे कार्य यांच्यातील संबंध अभ्यासण्यास मदत होईल.

**शोध निबंधाच्या मर्यादा :**

- केवळ निवडक व महत्त्वाच्या सुधारणांचा आढावा घेण्यात आलेला आहे

**संशोधनाचे पद्धतीशास्त्र :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वापरलेली संशोधन पद्धती ही ऐतिहासिक विश्लेषणात्मक आणि अभिलेखीय संशोधन पद्धती आहे. सदर निबंध हा प्राथमिक साधने, दुय्यम साधने यांवर आधारलेला आहे. प्रस्तुत संदर्भाचा आढावा घेतल्यानंतर चिकित्सक विश्लेषणानंतर संदर्भाचा आधार घेण्यात आला आहे. विश्लेषण केलेल्या माहितीच्या आधारे निष्कर्षांची मांडणी केलेली आहे.

भारत वसाहतीच्या जोकडातून मुक्त होऊन आपली वाटचाल करू लागला होता. त्यामुळे भारतासाठी प्रत्येक गोष्टीची एक सुरुवात होती. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळातच भारताला राष्ट्र म्हणून उदयास येण्याची संधी मिळाली व त्याचदरम्यान त्याचा प्रवास सुरू झाला. तेव्हा सर्व पातळ्यांवर राष्ट्र निर्मितीचे प्रयत्न सुरू होते. तसे पाहायला गेलास राष्ट्र म्हणून मान्यता मिळवण्यासाठी ज्या चार घटकांची गरज असते, ते म्हणजे पक्की लोकसंख्या, निश्चित भूभाग, सार्वभौम शासन, व इतर सार्वभौम राज्यांची परकीय संबंध

स्थापनेची क्षमता. तसे पाहायला गेल्यास या सर्व घटकांची पूर्तता 1947 साली भारताच्या स्वातंत्र्य सोबत झालेली पहावयास मिळते, पण त्याची शाश्वती मात्र नव्हती. आणि याच कारणामुळे भारतासाठी एक नवीन संकल्पना लागू पडली ती म्हणजे राष्ट्र बनण्याच्या प्रक्रियेतील राष्ट्र ( Nation in Making ). याच प्रक्रियेला पुढे दृढ बनवत भारताला राष्ट्र नव्हे तर मजबूत राष्ट्रांच्या पंगतीत बसवण्याचे काम स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या सुधारणांचे आहे त्या पुढील प्रमाणे.

- राजकीय सुधारणा :

कोणत्याही राष्ट्राचा मजबूत पाया हा तेथील शासनाद्वारे रचला जातो कारण देशाचा सार्वभौम कारभार हा तेथील शासनाच्या हातात असतो. त्याच पद्धतीने भारतात ती परिस्थिती होती. या घटकात राजकीय प्रकारच्या सुधारणा आपण पाहणार आहोत.

1950 साली भारताचे संविधान लागू होऊन भारत प्रजासत्ताक बनला. संविधानातील तरतुदीनुसारच देशातील सर्व यंत्रणा उभी राहिली, परंतु प्रसंगानुरूप त्याच्यामध्ये विविध सुधारणा होत गेल्या, ज्यामुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राष्ट्र उभारणीत त्यांचा हात राहिला आहे. सर्वप्रथम 1951 साली संविधानामध्ये एक नवे परिशिष्ट जोडून त्यात समाविष्ट कायद्यांना न्यायालयाच्या कक्षेपासून अलिप्त ठेवले गेले, ज्याचे कारण पहिल्या वर्षात मूलभूत हक्क राज्य धोरणांची नीती निर्देशक तत्व यात होणाऱ्या विरोधाभास हे होते. यामुळे सामाजिक आर्थिक व राजकीय न्यायाची समीकरणे बसवण्यास अडचण निर्माण होत होती, ज्या आश्वासनांवर देशातील जनतेने स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. याच विरोधाभासाचा प्रसंग पुढे सत्तरच्या दशकाच्या शेवटी व 80 च्या दशकाच्या सुरुवातीला उद्भवला, जेव्हा सर्वोच्च न्यायालयाने संसदेच्या संविधान सुधारणा करण्याच्या अमर्याद अधिकारांवर मर्यादा आणली. या सुधारणातून एका बाजूला लोकांसाठी न्याय यंत्रणा उभारणे सोपे झाले व दुसऱ्या बाजूला यंत्रणा उभारताना लोकांच्या अधिकारांचे हनन होणार नाही याची सुद्धा खबरदारी घेतली. याचप्रमाणे संविधानामध्ये व त्या माध्यमातून झालेली बदल म्हणजे वन व वनसंपदेला कायदेशीर संरक्षण प्राप्त करून देणे, लोकांच्या हक्कांसोबत त्यांची कर्तव्य सुद्धा नमूद करणे, यानंतर शिक्षण हा मूलभूत हक्क म्हणून घोषित करणे, कलम 21 जे जीविताचे व व्यक्तिगत स्वातंत्र्याची हमी देणारे कलम आहे, त्याची मर्यादा ही मोठ्या प्रमाणावर लोकांच्या दैनंदिन जीवनातील स्वातंत्र्याची जोडून त्याची व्याप्ती वाढवली, यासारख्या काही सुधारणांनी राष्ट्र उभारणीत हातभारच लावला.

याच सोबत आणखी काही राजकीय प्रकारच्या सुधारणा आपणास पाहावयास मिळतात. स्वातंत्र्य प्राप्त होताच भारत हा भौगोलिक दृष्टिकोनातून एक दिसत असला, तरी तो राजकीय दृष्ट्या मात्र एक नव्हता. जवळजवळ 540 च्या आसपास संस्थाने व संस्थानिक यात तो विभागला गेला होता. या सर्वांना राष्ट्राशी जोडणे व एकसंघ राष्ट्र उभे करणे महत्त्वाचे होते व ते करण्यात आले. यासाठी अनेक अडचणींना सामोरे जावे लागले, पण अखेर ते झालेच. पुढच्या टप्प्यात देशांतर्गत भाषावार प्रांतरचनेच्या मागण्या व आंदोलने जोर धरू लागली. या सर्वांवर सुद्धा उपाय म्हणून फजल अली आयोगाच्या शिफारशी स्वीकारत, राज्य पुनर्रचना कायदा अस्तित्वात आणून देशात तत्कालीन राज्य व केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आले. पुढील काळात पुन्हा विविध मागण्या व घटक विचारात घेऊन भारताचा राजकीय नकाशा सतत बदलत राहिला, पण अंतर्गत सीमांतर्गत सुधारणांनी सुद्धा राष्ट्र उभारणीत हातभार लावला. जसे कोणत्याही मजबूत राष्ट्राचा पाया हे त्याचे नागरिक असतात, त्याचप्रमाणे भारतात नागरिकत्वाचा प्रश्न ज्वलंत होता. देशाच्या विभाजनामुळे नागरिक व नागरिकत्वाबाबत असंख्य अडचणींना सामोरे जावे लागले, पण अशा परिस्थितीत कठोर पण सोबत संवेदनशीलतेचे धोरण राबवत प्रश्न हाताळला. यासाठी अनेक नागरिकत्व सुधारणा कायदे लागू केले व या सुधारणा पुढील काळात देशासाठी उपयोगी ठरल्या. पुढील काळात शासनाचा तिसरा स्तर समजला जाणारा स्थानिक स्वराज्य संस्थांचा मुद्दा देखील लोकशाही बळकटीकरणासाठी, राष्ट्र उभारणीसाठी महत्त्वाचा होता. स्वातंत्र्यापासून असंख्य समित्या व आयोगांच्या शिफारशींना अनुसरून 72 व 73 वा संविधान दुरुस्ती कायदा संमत करून, स्थानिक शासनाचा पाया रचला गेला. याचबरोबर तरुणांचा राष्ट्र उभारणी व लोकशाही सदृढीकरणातील भूमिका लक्षात घेऊन मतदानाचे वय 21 वरून 18 केले व त्यांना सामावून घेऊन व्याप्ती वाढवली व त्याचा सहभाग सुनिश्चित करून राष्ट्र उभारणीत मदत झाली. याप्रमाणे राजकीय सुधारणांची भूमिका राहिलेली आहे.

- आर्थिक सुधारणा.

जगाच्या पाठीवरील कोणत्याही राष्ट्राच्या उन्नतीचा व दुर्गतीचा पाया म्हणजे तेथील अर्थव्यवस्थेची स्थिती जी पार्श्वभूमी राजकीय सुधारणांच्या पाठीमागे होती तीच आर्थिक सुधारणांच्या मागे देखील होती वसाहतवादी जोखड फेकून दिल्याने अनेक गोष्टींची नव्याने सुरुवात होती तर दूरदृष्टीचे नेते देशाला लाभल्याने काही गोष्टींची सुरुवात आधीच झाली होती ज्यात स्वातंत्र्यानंतर सोयीस्कर बदल केले व राष्ट्र उभारणीच्या कार्यात आर्थिक मंच देखील उभा केला.

स्वातंत्र्यापासूनच व त्याआधी काही वर्षांपासून तत्कालीन नेतृत्वाने भारतीय अर्थव्यवस्था ही समाजवादी प्रकारची असेल असे ठरवले होते. समाजवादी अर्थव्यवस्थेची महत्त्वाची वैशिष्ट्य म्हणजे नियोजित अर्थव्यवस्था. 1938 सालीच राष्ट्रीय नियोजन कमिटी काँग्रेस द्वारे स्थापन झाली होती, जिलाच पुढे नियोजन आयोगाचे स्वरूप प्राप्त झाले व त्या माध्यमातून पंचवार्षिक नियोजन सुद्धा सुरू झाले. यात राज्यांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी राष्ट्रीय विकास परिषदेची स्थापना केली व संघराज्यवादाला बळकटी दिली. पंचवार्षिक योजनांच्या उद्दिष्टांमध्ये सुद्धा सुधारणा करत, विविध समयोपात विविध प्राधान्यक्रम निश्चित करत योजना आखल्या. पुढील काळात 2015 साली नियोजन आयोग बरखास्त करून तत्कालीन शासनाने त्या जागी नीती आयोग नावाची नवी संस्था आणली. यांच्या माध्यमातून शासनाची व त्या माध्यमातून देशाच्या अर्थव्यवस्थेचे चक्र व त्याची गती संतुलित राखून राष्ट्र उभारणीसाठी मदत केली. याचप्रमाणे पुन्हा जनतेसाठीची महत्त्वाची सुधारणा म्हणजे स्वातंत्र्यानंतर लगेच वर्षभरात जमीनदारी निर्मूलन करणारे कायदे अस्तित्वात आले. त्याचप्रमाणे संसाधनांचे न्याय वितरण व आर्थिक विषमता कमी करण्यासाठी जमीन धारनेवर मर्यादा आणून अतिरिक्त जमीन भूमिहीन मजुरांमध्ये वाटण्याचा कार्यक्रम सुद्धा हाती घेण्यात आला. कुळ कायद्यांच्या माध्यमातून खंडकरीणा जमिनींचे मालकी हक्क प्रदान करण्यात आले. याच कार्यक्रमाला अनुसरून पुढील काळात राष्ट्रीयकरणाचे धोरण देखील अवलंबिण्यात आले. या माध्यमातून देशासाठी महत्त्वाचे असणारे उद्योग, उपक्रम, संसाधने यांचे राष्ट्रीयकरण करून त्यावर सार्वजनिक मालकी प्रस्थापित करण्यात आली. याचे उदाहरण म्हणजे 1969 चे बँक राष्ट्रीयकरण, कोळसा खाणींचे राष्ट्रीयकरण, विमान कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण, इ. याच सोबत मोठे अवजड उद्योग सुद्धा सार्वजनिक तत्वावर उभारण्यात आले. असे करत असताना खाजगी उद्योगाकडे पाठ फिरवण्यात आली नाही. त्यांचा देखील सहभाग सुनिश्चित करण्यात आला, मात्र त्याकरिता विशिष्ट अटी व नियम घालण्यात आले जेणेकरून सार्वजनिक हिताला बाधा पोहोचणार नाही. त्यातील सुधारणा म्हणजे लायसन्स व कोटा पद्धत, मोनोपोलिस्टिक अँड रेस्ट्रिक्ट ट्रेड प्रॅक्टिसेस अ‍ॅक्ट( MRTP) इत्यादी या सर्वांच्या माध्यमातून समाजवादी अर्थव्यवस्था साकारण्याचे कार्य करण्यात आले. कारण वसाहतीच्या कालखंडात जी अर्थव्यवस्थेची पीछेहाड झाली होती तिला पुन्हा उभे करण्यासाठी हा उपाय योजना गेला.

पुढील काळात जेव्हा जागतिक स्तरावर मोठे बदल होत गेले. जागतिक व्यापार, अर्थव्यवस्था आर्थिक, परकीय, राजनैतिक संबंधात बदल होत गेले व भारता त्याबरोबर वेग गाठण्यात मागे पडू लागला आहे, असे धोरणकर्त्यांच्या लक्षात येताच, मोठी सुधारणा घडवून आणण्यात आली. ती म्हणजे 1991 ची उदारीकरण खाजगीकरण व जागतिकीकरणाची नीती. या सुधारणेमुळे भारत हा पुन्हा नव्या रूपाने व पद्धतीने जगाशी जोडला गेला. या माध्यमातून खाजगी क्षेत्राला उत्तेजना देण्यात आली.

याप्रकारे आर्थिक सुधारणांच्या माध्यमातून राष्ट्र उभारणीचे कार्य करण्यात आले. वरील सुधारणांसोबत बँकिंग रेगुलेशन अ‍ॅक्ट, आयकर कायदा, FEMA FERA कायदे, विविध आयात निर्यात व व्यापार व औद्योगिक धोरणे ज्यांच्या माध्यमातून तत्कालीन परिस्थितीत अनुसरून सुधारणा घडवून आणल्या ज्या राष्ट्र उभारणीत महत्त्वाच्या ठरल्या.

- सामाजिक सुधारणा.

मागे म्हणल्याप्रमाणे राष्ट्र उभारणीच्या कार्यात सर्वात महत्त्वाचा वाटा हा जनतेचा असतो. भारतासंदर्भात सर्वप्रथम जनतेला आधार देऊन, त्यांना सक्षम व कार्यक्षम करणे प्रथम महत्त्वाचे होते व त्याकरिता जे विविध अंगाने प्रयत्न झाले त्यात सामाजिक पद्धतीचे सुद्धा होते.

वसाहतवादी सत्तेने भारतीय सामाजिक क्षेत्रात सुधारण्याचे संदर्भात लाभदायक प्रयत्न केलेले नव्हते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर

ते सर्व कार्य नवनियुक्त शासनावर येऊन ठेपले. यामुळे जे निर्णय या सुरुवातीच्या काळात झाले ती सुरुवात व सुधारणा दोन्ही होत्या असे म्हणावे लागेल. बहुतांश सामाजिक सुधारणांची मुळे आपणास संविधानात दिसून येतात, यात समान न्याय, स्वातंत्र्याचे अधिकार, अस्पृश्यता बंदी इत्यादी यांचा समावेश होतो. पुढील काळात त्याच आधारावर विविध कायदे अस्तित्वात येऊन सामाजिक सुधारणांचा खांब उभा करून त्यावर राष्ट्र उभारणीचा बोजा पेलवला गेला.

धर्म, वंश, जात, लिंग, जन्म ठिकाण यांसारख्या कारणावरून भेदभाव व द्वेष होणार नाही याकरिता कायद्यांची मालिका निघाली. अस्पृश्यता बंदी कायदा त्याला पुढे नागरी हक्क संरक्षण कायद्यात रूपांतरित करून अधिक कडक अंमलबजावणी निश्चित केली. त्याचप्रमाणे हिंदू कोड बिल च्या माध्यमातून देशातील हिंदू समाजजणांच्या विशेष करून महिला व बालकांच्या हक्काची निश्चिती केली गेली. अगदी अलीकडच्या काळात ट्रिपल तलाक कायद्याद्वारे रद्द करून मुस्लिम महिलांना सुद्धा समान न्याय तरतूद केली. राष्ट्र उभारणीच्या कार्यात देशातील सर्व समाज घटकांचे योगदान महत्त्वाचे असते, यालाच अनुसरून देशातील अनुसूचित जमाती, अनुसूचित प्रदेश, आदिवासी समाज यांच्या सामाजिक व विशेष हक्कांचे जतन होण्याच्या दृष्टीने त्यांच्यासाठी कायद्याद्वारे विशेष प्रावधान करून त्यांची व्यवस्था लावली गेली, जेणेकरून त्यांचे व त्यांच्या रुढीगत प्रथा, परंपरा, संपत्तीचे शोषण होणार नाही. पुढील काळात महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून विविध राज्यांनी नोकरीत महिलांना आरक्षणाची तरतूद केली आहे, जी 50% पर्यंत सुद्धा आहे. स्थानिक शासनात देखील महिलांकरिता जागा आरक्षित करण्याची तरतूद केली गेली आहे. याप्रमाणे देशातील मागास समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या करीता सुद्धा नोकरी, शिक्षण व राजकीय पदांच्या निवडणुकीत आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. या सर्व सुधारणांमुळे मुख्य प्रवाहात नसलेले लोक प्रवाहित होण्यास मदत होईल व त्या सर्वांसाठी एक हातभार राष्ट्र उभारण्याच्या कार्यात लागण्याचा विश्वास आहे.

काही सुधारणा अशा होत्या तिच्या आर्थिक स्वरूपाच्या असल्या, तरी त्यांचा उद्देश मात्र सामाजिक स्वरूपाचा होता. संस्थानांचे जे विलीनीकरण पार पडले, तेव्हा सर्व संस्थानिकांना एक भत्ता देण्याचे मंजूर केले होते, जो आर्थिक स्वरूपाचा होता, ज्याल प्रीव्ह पर्स असे म्हणले जात. 1980 च्या दशकात तो रद्द करण्यात आला व तो निधी इतर कार्यांसाठी वापरला गेला. याचप्रमाणे बँक राष्ट्रीय करणाच्या बाबतीत सामाजिक हेतू साध्य करण्यात आला. खाजगी मालकीच्या बँका असल्याने त्या केवळ निवडक व्यक्तींपुरत्या मर्यादित रहात पण त्या राष्ट्रीयकृत झाल्याने त्यांचे जाळे तळापर्यंत पोहोचून देशातील बहुतांश वर्गांचे आर्थिक समायोजन पार पडले. पुढे या बँकांच्या धोरणात सुधारणा करून त्यांना कर्ज वाटपाचे निकष निश्चित करून देण्यात आले जे सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे होते. अग्रणी बँक योजना, अग्रक्रम क्षेत्र कर्ज पुरवठा, सारख्या सुधारणा करून जनतेला आर्थिक समायोजनात सामील केले. याचप्रमाणे गरिबांसाठी अन्नपुरवठा साखळी सुधारित करून PDS स्वरूपात त्याचे रूपांतरण झाले.

या व अशा अनेक सुधारणांमुळे देशाची सामाजिक बाजू भक्कम करण्यात येऊन प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे त्यांचा हातभार राष्ट्रउभारणीच्या कार्यात करून घेतला सामाजिक व एकंदरीत सर्व सुधारणांचा एक समान हेतू म्हणजे जनतेला सक्षम करणे व हे साध्य होणे म्हणजे राष्ट्र उभारणी करणे.

इतर सुधारणा.

या घटकात अशा सुधारणांचा आढावा आहे, ज्या देखील वरील उपघटकां इतक्याच महत्त्वाच्या ठरल्या. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला सुधारणा नव्हे तर सुरुवात करण्याची आवश्यकता होती पण तरीदेखील यांना सुधारणा म्हणावे लागेल. या क्षेत्रातील सुधारणांना संस्थाकरनाचा (Institutenalism) चा काळ म्हणावा लागेल. AIIMS, इस्रो, न्यूक्लिअर कमिशन अँड रिसर्च सेंटर, IIT, IIM, Power project, ONGC, SAIL, BHEL, ICL, इत्यादी सारख्या असंख्य संस्थांची मुहूर्तमेढ त्या काळात रोवली गेली. ज्यामुळे विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रात भारत सक्षम होऊ शकला, ज्याची पोचपावती आपणास तेथून पुढच्या काळात मिळाली, जेव्हा जागतिक विज्ञान तंत्रज्ञान क्रांतीत भारताचा टिकाव लागला. यादरम्यान सुरू झालेल्या अनेक संस्था व उद्योगांच्या धोरणात सुद्धा पुढील काळात बदल केले व काळानुरूप त्यांना सक्षम बनवण्यात आले.

याप्रमाणे अलीकडच्या काळात पाहायला गेल्यास स्वातंत्र्याच्या लगतच्या काळात जी परिस्थिती होती, तशी राहिलेली नसून

त्याप्रमाणे सुधारणांच्या बाबतीत देखील बदल होऊ लागले आहेत. माहितीचा अधिकार, लोकपाल व लोक आयुक्त कायदा, समान नागरी कायदा, जातीगत जनगणना, आरक्षणाचे उपवर्गीकरण अशा जबाबदार शासन प्रकारच्या सुधारणा करण्यात धोरणकर्त्यांचा कल असलेला दिसतो.

याचप्रमाणे संरक्षणाच्या क्षेत्रात सुद्धा अनेक सुधारणा घडवून येत आहेत. यात भारत आण्विक शस्त्रांनी सुसज्ज होणे ही सर्वात मोठी सुधारणा आहे. आत्मनिर्भर भारत व मेक इन इंडिया यासारख्या योजना संरक्षण क्षेत्रात लागू करून त्या माध्यमातून सुधारणा करण्याचा प्रयत्न आहे.

याचसोबत अवकाश क्षेत्रातील सुधारणा या भारताला जागतिक प्रगत देशांच्या यादीत नेतात. काही अवकाश तंत्रज्ञान तर अशा प्रकारचे आहे जे केवळ हाताच्या बोटावर मोजण्या एवढ्या देशांकडे आहे, त्यात भारताच्या समावेश होतो. त्यात स्पेस डॉकिंग, क्रायोजेनिक तंत्रज्ञान इत्यादींचा समावेश होतो.

रस्ते विकास, रेल्वे, उद्योग या व अशा अनेक क्षेत्रातील सुधारणांमुळे भारताच्या राष्ट्र उभारणीत मोलाचे योगदान झालेले आहे.

या सर्व सुधारणांच्या माध्यमातूनच भारताचे राष्ट्र उभारणीचे कार्य घडून आले.

**निष्कर्ष :**

भारताची किंबहुना कोणत्याही राष्ट्राची उभारणी ही एका ठिकाणी बसून, आराखडा तयार करून, तो राबवून होत नसते. त्यासाठी मोठा कालखंड व मोठ्या निर्णय धोरणांची आवश्यकता असते. यालाच अनुसरून भारतात राष्ट्र उभारणीची प्रक्रिया पार पडली. इतर कोणत्याही ठिकाणांपेक्षा येथे राष्ट्राची ओळख निर्माण करण्यापासून ते लोकांना एकमेकांविषयी बंधुभाव निर्माण करण्यापासून ते पुढील काळात सामाजिक, आर्थिक, राजकीय धोरणे व सुधारणा राबवून ही प्रक्रिया सुरू ठेवण्यात आली. यामुळेच भारतासाठी निर्माणधीन राष्ट्र ( Nation in Making) ही संज्ञा वारंवार वापरली जाते. यासाठी सुद्धा कोणतेही असे एकक व मोजमाप नाही की ज्या माध्यमातून राष्ट्रनिर्मितीचे मोजमाप करून घेता येईल. त्या सर्व गोष्टी या राष्ट्राची विविध अंगावरून करण्यात आलेल्या कसोट्यांच्या माध्यमातून होते व या कसोट्यांचे निकष देखील सर्वांसाठी समान असत नाही. त्यामुळे अंतिम प्रमाणपत्र देणे व देणारी संस्था आज अस्तित्वात नाही.

याआधी उल्लेख केल्याप्रमाणे भारताला ज्या गोष्टींचा राष्ट्र उभारणीसाठी फायदा झाला असे बहुतांशांचे मत आहे, त्यातील काही गोष्टींची ती सुरुवात होती, तर काही गोष्टी या सुधारणा म्हणून समोर आल्या. स्वातंत्र्यप्राप्तीच्या दरम्यान स्वातंत्र्यलढ्यातून निर्माण झालेल्या उदात्त आदर्शांची प्रेरणा भारतीय जनतेच्या मनात झाली होतीच. त्यामुळे वासाहतीक सत्तेच्या जोखडाखाली असतानाच भारताचा राष्ट्र उभारणीचा पाया रचला गेला व स्वातंत्र्यानंतर त्याला गती आली. राष्ट्र उभारणीचा अर्थ कोण्या राष्ट्रासाठी आपल्या सीमा बळकट करून घेणे असा असतो, तर कोण्या राष्ट्रासाठी तो शत्रू राष्ट्राला नामशेष करणे असा असतो, कोणासाठी तो विशिष्ट धार्मिक समुदायाला पुढे नेणे असा असू शकतो, तर कोणासाठी तो अल्पसंख्यांकांना नामशेष करणे असा असतो, कोणाचा अर्थ केवळ विकास, संसाधनांची उत्पादन उत्पादकता वाढवणे असा विविध अंगांनी घेतो .परंतु भारतामध्ये ज्या सुधारणा व निर्णय धोरणांची अंमलबजावणी झाली त्यावरून असे स्पष्ट संकेत मिळतात, भारतासाठी राष्ट्र उभारणीचा अर्थ हा येथील जनतेला सशक्त करणे व त्यांच्या कल्याणासाठी असलेले शासन उभे करणे असे आहे व त्याच माध्यमातून एक मजबूत राष्ट्र उभे राहू शकते असा विश्वास धोरणकर्त्यांना असलेला वाटतो.अर्थात याच्या सोबतीला संरक्षण व परराष्ट्र व सुरक्षाविषयक बाबतीत सुद्धा तितकी सजगता दाखवलेली दिसते.

लोकांना, जनतेला सक्षम करणे याचातरी अर्थ नेमका काय. तर ज्या गोष्टींबाबत मागासता आढळते, त्याचा पुरवठा करून, त्याची पातळी गाठणे. एकदा पातळी गाठली गेली व जनता सुदृढ व सक्षम बनली, की राष्ट्र उभारणीसाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता भासत नाही, तर ते आपोआप साकारले जाते व त्याचे निर्माणकर्त, पाईक व पुन्हा लाभार्थी ही पुन्हा जनताच होते. त्यामुळे ही एक साखळी असते. भारतामध्ये आपणास हाच पॅटर्न पाहायला मिळतो. लोकांना सामाजिक, आर्थिक, राजकीय दृष्ट्या लाभ होतील व ते लाभ जास्तीत जास्त तळागाळापर्यंत पोहोचतील याची तरतूद करण्यावर शासनकर्त्यांचा जोर राहिलेला आहे. जनतेच्या रोजच्या जीवनातील सार्वजनिक गरजा भागल्या की ते इतर गोष्टींचा विचार करू शकतात, यातीलच

एक राष्ट्र उन्नती व उभारणी. त्यामुळे जोपर्यंत लोक सार्वजनिक गरजांपासून वंचित व सामाजिक व राजकीय हक्क व सुविधांपासून वंचित राहतात तोपर्यंत त्यांना राष्ट्र व त्यांच्या संबंधित घटकांशी लागेबांधे राहत नाहीत. याला एक अपवाद म्हणजे एखादी अनपेक्षित घटना जसे युद्ध वा परकीय आक्रमणावेळी लोक आपले सर्व इतर आकस व मागण्या बाजूला सारून एकजूटपणे राष्ट्राच्या पाठीशी खंबीरपणे उभे असतात. पण जर वरील निकष पूर्ण असतील तर मात्र ते कायम राष्ट्रासाठी एक पाऊल पुढे टाकते पुढे असतात.

यात याच प्रमाणे वर उल्लेखित सर्व सुधारणा या कशा प्रकारे राष्ट्र उभारणीच्या कार्यात उपयोगी ठरल्या याचे विश्लेषण केलेले आहे. भारत हा एकमेव देश आहे ज्याच्या एकता व अखंडता व राष्ट्राच्या उन्नती व प्रतिष्ठेसाठी संविधानापासून ते सामान्य कायद्यान पर्यंत सर्वत्र तरतूद आहे व ती विना अडथळा सर्वत्र पालन होते या उपर राष्ट्र उभारणीच्या सशक्तेचा आणखी काय पुरावा असू शकतो. जय हिंद.

**संदर्भसूची :**

प्रकाशित प्राथमिक साधने.

इंग्रजी.

1. The constitution of India, Ministry of Law and Justice, Government of India, 2024.
2. Selected Works of Jawaharlal Nehru, general editor, S. Gopal, vol.12 to 15
3. Nehru speeches, vol. 1 to 3.

प्रकाशित दुय्यम साधने

1. Gopal.S, Jawaharlal Nehru - A biography ,vol.2, London, OUP India, 2013.
2. Basu. D. D, Introduction to the Indian constitution, Educational printed, 2022.
3. Kothari Rajani, politics in India, New Delhi, 1986.
4. Chandra Bipin, India’s struggle for Independence, New Delhi, 1989
5. Tendulkar Suresh, Indian economic policy reforms and poverty : an assessment in Ahluwalia and Little, India’s economic reforms, 1998.
6. Khusro.A.M in Singh.V.B, ed, Economic History of India 1857-1956, Delhi, 1965.
7. Vaidyanathan.A, The Indian Economy since Independence 1947-70, ed. The Cambridge Economic History of India, Delhi, 1984.
8. Chandra. Bipin, India after Independence, New Delhi,1999,
9. Guha. Ramchandra, India after Gandhi,Pan books, New Delhi, 2017
10. Hendre Sudhir, Undeclared civil war in India, Mumbai, 1975.

मराठी.

1. पामदत्त रजनी, अनु. देवधर.य.ना, आजकालचा भारत, पुणे २००६.